

समाजकार्य पुरस्कार

शहाजी गडहिरे

कार्यकर्ता पुरस्कार
(प्रबोधन)

परिवर्तनाच्या प्रवाहातला खंदा कार्यकर्ता

नव्वदच्या दशकातली ही गोष्ट.

सोलापूर हा पश्चिम महाराष्ट्रातला जिल्हा. तसा मराठवाड्याशी सलगी असलेला. 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळी'मुळे खेड्यांतील दलितांमध्ये नवं आत्मभान आलेलं. शिवसेनेने नामांतराला विरोध दर्शवून दलित विरुद्ध सवर्ण असं ध्रुवीकरण साधलेलं. त्यामुळे छोट्या गावातल्या दलित वस्तीतही आंबेडकर जयंतीचा जोश असायचा. या वातावरणाने शहाजीभाऊही भारावले होते. पण जयंतीचा उत्साह ओसरल्यावर पुन्हा मोलमजुरी नि नेहमीच्या चिंता. समाजाकडे पाहावं की आपलं जीवन सुधारावं? अशी द्विधा मन:स्थिती. या विवंचनेच्या काळात युवा संस्थेने एक संधी दिली. या कामातून दरमहा दीडशे रुपये मिळणार होते. त्या आशेवर शहाजी गडहिरे 'परिवर्तन'च्या प्रवाहात सामील झाले.

शहाजीभाऊंच्या व्यक्तिमत्त्वात जरब-दरारा नाही. गडद सावळी कांती, पाच-सव्वापाच फूट उंची, बोलण्याची लय संथ, ना त्वेष-आवेश, ना कसलेही आग्रही आविर्भाव. त्यामुळे हा तरुण पुढे छाप पाडेल याची फारशी कुणाला खात्री नसावी. पण आपल्या संयत-मितभाषी स्वभावाला सांभाळतच शहाजीभाऊंनी कळीच्या सामाजिक प्रश्नांवर रचनात्मक काम उभं केलं. भूमिहीन दलितांच्या

उदरनिर्वाहाचे प्रश्न, दुष्काळ नि स्त्री-पुरुष विषमता या ज्वलंत समस्यांचा वेध 'अस्तित्व' संस्थेच्या माध्यमातून शहाजीभाऊ घेत आले आहेत.

गरिबीमुळे शहाजीभाऊ एम.ए. ची परीक्षाही देऊ शकले नाहीत. ती खंत त्यांना आजही डसते. पण रूढार्थाने 'उच्चविद्याविभूषित' नसलेल्या शहाजीभाऊंनी भारतातील एका महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नावर लक्ष केंद्रित केलं. जातिव्यवस्था व ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित हा प्रश्न म्हणजे दलितांमधील भूमिहीनता! नॅशनल सँपल सर्व्हेच्या आकडेवारीनुसार भारतात केवळ १७.१% दलितांकडे जमीनमालकी आहे. म्हणजे देशातील जवळपास ८५% दलित भूमिहीन आहेत. युवा संस्थेमार्फत शहाजीभाऊंनी चिपळूणमधील 'श्रमिक सहयोग' व अंबाजोगाईतील 'मानवलोक' संस्थांचं काम पाहिलं. पण या दोन वर्षांच्या काळात त्यांना सर्वाधिक भावलं सोलापूरमधील 'आंबेडकर शेतीविकास संशोधन संस्थे'चं कार्य. मग त्यांनी याच संस्थेत काम करायचा निर्णय घेतला.

'आंबेडकर शेती विकास संशोधन' या संस्थेने त्या काळात सोलापूरमधील महार वतन जमिनींची माहिती मिळवली होती. शहाजीभाऊ सांगतात, ''त्या अभ्यासाने आम्हाला जागं केलं. एकही पूर्वाश्रमीचं महार कुटुंब तेव्हा शेती करत नव्हतं. आणि यांच्या मालकीची जवळपास साडेपाच हजार एकर महार वतन जमीन केवळ सांगोला तालुक्यातच पडीक होती. या जमिनींचे मालक मोलमजुरी करत किंवा ऊसतोडीला जात...'' डॉ. आंबेडकरांचा 'शहरांकडे चला!' हा संदेश या मंडळींच्या अंतर्मनात भिनलेला. पण मेंदूला पालवी फुटली तरी पाय अजून खेड्यातल्या मातीत घट्ट रुतले होते. परिणामी एकप्रकारची त्रिशंकु अवस्था दलितांच्या वाट्याला आलेली शहाजीभाऊंनी पाहिली.

महार जमातीने पूर्वी लढायांमध्ये मर्दुमकी गाजवली; तसंच त्या काळच्या सुभ्यांनी जिंकलेले प्रदेश, गावं, किल्ले व तटांचं रक्षण केलं. पहारेकरी म्हणून निष्ठेने चाकरी केली. त्यामुळे या महार सैनिकांना 'महार वतने' बहाल झाली. नंतरच्या काळात गावकामगार झालेल्या या मंडळींना उदरनिर्वाहासाठी गायरान जमिनी मिळाल्या. विशेषत: हैदराबादच्या निजामाने बहाल केलेली अशी गायरानांची मालकी आजही सरकारदप्तरात दलितांच्या नावे आहे. पण या बरड जमिनींवर 'स्वाभिमानाचं' पीक घेता येत नाही. गावकरी गायरानांवर गुरं चरतात, दलितांना मात्र तिथे मज्जाव. पण महार वतन जमिनी ओस आहेत. तुकड्यांमध्ये विखुरलेल्या या जमिनींवर सामुदायिक शेती शक्य आहे. ही गरज ओळखून 'आंबेडकर शेती विकास संशोधन' संस्थेने सांगोल्यातील डोंगरगावात 'समता प्रकल्प'ची आखणी केली. शहाजीभाऊ या प्रकल्पाचे एक बिनीचे शिलेदार.

डोंगरगावात ९० एकर महार वतन जमिनी होत्या. या जमीनमालकांपैकी अनेकजण शहरांत स्थायिक झालेले. गावात असलेले गरिबीत दुबळं जीवन कंठत होते. यांपैकी ३५ कुळांना संघटित करण्यात आलं. जमिनीचे सर्व्हे झाले. बरड जमिनीवरचे खडे वेचून ती शेतीयोग्य केली गेली. बांध घातले गेले. एक विहीर दुरुस्त करून पाण्याची सोय झाली. महार वतनी जमिनींवर सामुदायिक शेतीचा हा कदाचित पहिलाच प्रयोग असावा. कष्ट सर्वांनी आळीपाळीने करायचे, नि उत्पन्न समान वाटून घ्यायचं. असा हा समता प्रकल्प! दहा वर्षं शहाजीभाऊंनी या प्रकल्पाचं निरीक्षण केलं. वंचित माणसं एकत्र आल्यावर कशी सन्मानाने जगू लागतात याचा अनुभव त्यांना या दरम्यान आला.

डोंगरगावातील शिदोरीच्या बळावर शहाजीभाऊंनी स्वतंत्रपणे हाच प्रयोग अन्यत्र करण्याचा

निर्णय घेतला. त्यासाठी 'अस्तित्व' या संस्थेची नोंदणी केली. २००३ मध्ये अस्तित्वच्या माध्यमातून त्यांनी आपल्या वाणी-चिंचाळा गावात महार वतनधारकांना संघटित केलं. या गावात ५४ कुटुंबांच्या मालकीची १७२ एकर महार वतन जमीन पडीक होती. यांपैकी केवळ दोनच खातेदार शेती करत. शहाजीभाऊ सांगतात, ''ही जमीन गाववस्तीपासून खूपच दूर होती. तिकडे जायला माणसं भ्यायची. वन्यप्राण्यांशिवाय भुताखेतांनाही माणसं घाबरत...'' शहाजीभाऊंचं एक निरीक्षण आहे. ते म्हणतात, ''पूर्वाश्रमीचे महार शिपायाची नोकरी करतील, दुसऱ्या शेतमालकाची कष्टाने चाकरी करतील, पण आपण स्वत: सन्मानाने शेतकरी होऊ! ही प्रेरणाच त्यांच्यात जाणवत नाही!'' पिढ्यान्पिढ्यांची लाचारी हाडीमासी भिनल्याचं हे लक्षण शहाजीभाऊंना वाटतं. त्यामुळे वाणी-चिंचाळ्यात सामुदायिक शेतीचा प्रयोग करताना त्यांना खूपच कष्ट पडले. या खातेदारांकडे शेतीसाठी भांडवल नव्हतं. भूविकासासाठी पैशांची गरज होती. म्हणून अफार्म संस्था व शासकीय योजनांचं सहाय्य घेण्यात आलं. सुरुवातीला भांडवली खर्चाचा ७५% भार संस्थेने उचलला. पाचशे रुपयांची बियाण्यांची बॅग घ्यायची असेल तर खातेदाराने दोनशे रुपयांचं योगदान द्यायचं. फळझाडांसाठी खड्डे खणण्याचं श्रमदान शेतकऱ्यांचं, रोपं संस्थेने पुरवायची. या तत्त्वांवर वाणी-चिंचाळ्यात कामाने आकार घेतला.''या प्रयोगात सामील झालेले ५४ पैकी ५० खातेदार आता सन्मानाने शेती करत आहेत. वर्षाला ज्वारी-बाजरीसह डाळींबाच्या माध्यमातून लाखोंची कमाई करत आहेत,'' असं शहाजीभाऊ सांगतात.

आता हाच प्रयोग नवबौद्धांसह अन्य दलित जमातींसोबत राबवण्याचा निर्णय शहाजीभाऊंनी घेतला. त्यासाठी भोसे व हंगीर्गे या गावांची निवड केली. या गावांमध्ये मातंग, होलार, चर्मकार, धनगर या जमातींनाही सामुदायिक शेतीच्या प्रयोगात सामील करण्यात आलं. पण तीव्र जातिभेद आपसातले तंटे-बखेडे, पोकळ अहंकार अशा अनेक कारणांमुळे हे प्रयोग फारसे यशस्वी झाले नाहीत.

जातिव्यवस्थेला ठिसूळ करण्याचे शहाजीभाऊंचे हे प्रयत्न व्यापक दृष्टीने पाहायला हवेत. वादविवाद, आपलं-परकं कुठं होत नाही? पूर्वाश्रमीचे शेतमजूर शेतकरी झाले हेच या प्रयोगांचं यश! शहाजीभाऊ म्हणतात, ''दारिद्र्यरेषेखालील मंडळी मध्यम उत्पन्न गटात सामूहिक प्रयत्नांनी सामील होऊ शकतात, हे आम्ही यातून सिद्ध केलंय...'' रया गेलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत शहाजीभाऊंनी केलेल्या या प्रयोगांचं मोल अभ्यासकांनी जाणून घ्यायला हवं. सांगोला हा कायम दुष्काळी तालुका आहे. पण या तालुक्यातील शेतकऱ्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारात आपली डाळींबं पोहोचवलीत. अशा बागायतदारांमध्ये 'अस्तित्व' संस्थेमार्फत शेती करणारे वंचित जातीतील शेतकरीही आहेत. त्यांच्या यशकथांचा अभ्यास व्हायला हवा.

शहाजीभाऊ म्हणतात, ''२०१२ नंतर तीव्र दुष्काळ आम्ही पाहिले. नापिकीचा सामना करावा लागला. त्यामुळे आम्ही धान्यबँक हा प्रयोग राबवला.'' जवळपास दोन वर्षं या धान्य बँकेतून अनेकांच्या चुलींचा निखारा विझला नाही. पोराबाळांना उपासमारीची धग सोसावी लागली नाही.

''अलीकडे अतिवृष्टी झाली. पूर आला. त्यात कित्येकांची गुरं वाहून गेली. शासनाच्या विमा योजनेमुळे या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळाली. पण वंचित जातीतील लोकांना मात्र नुकसानभरपाई मिळाली नाही,'' असं शहाजीभाऊ म्हणतात,''भटक्या जमातींसाठी गाढव हेच कामधेनू असतं. पण शासनाकडे गाढवांचा विमा उतरवण्याची योजना नाही.'' त्यामुळे शहाजीभाऊंनी गाढवांचा

विमा उतरवण्याची योजना आखली व ती प्रत्यक्षातही आणली. अनेक भूमिहीन व अल्पभूधारकांना शेळ्यांपासून उत्पन्न मिळतं. पण दुष्काळाच्या काळात सरकारच्या चारा छावण्यांमध्ये केवळ मोठ्या जनावरांसाठीच सोय होती. परिणामी कित्येकांना कवडीमोल भावात शेळ्या विकाव्या लागल्या. एकदा शेळ्या विकल्या की, परत विकत घेऊन पुन्हा हे उत्पन्नाचं साधन हस्तगत करणं गरीब शेतमजुरांना जमत नाही. ही अवस्था पाहून अस्तित्वमार्फत शेळ्यांसाठी चारा-पुरवठा करण्याचं बहुमूल्य काम शहाजीभाऊंनी केलं.

पूर आला तेव्हाही शहाजीभाऊंनी दाखवलेली समयसूचकता वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल. ते म्हणतात, ''पूरपरिस्थितीत सधन लोकांकडे मदतीचा ओघ आला, पण गरिबांच्या गरजांकडे फारसं कुणाचं लक्ष गेलं नाही.'' पूरपरिस्थितीत सगळी जमीन ओली झाल्याने गरिबांकडे साधं उठाबसायला काही नव्हतं. सगळा संसार पाण्यात गेलेला. शहाजीभाऊंच्या संस्थेने भांडी वगैरे तर पुरवलीच, पण सर्वप्रथम प्लॅस्टिकच्या चटयांचं वाटप केलं. जेणेकरून बाया व मुलं कोरड्या जमिनीवर बूड टेकू शकली. दुष्काळ व आपत्तीच्या काळात गरिबांचा कैवार घेणारे शहाजीभाऊंसारखे लोक आपल्या समाजात आहेत हे आपलं नशीब!

'अस्तित्व'ने स्त्री-पुरुष समानतेबाबत एक वेगळा उपक्रम राबवला. महाराष्ट्र शासनाचा २००४चा एक जी.आर. घेऊन त्याआधारे ठोस बदल घडवण्याचा निर्णय संस्थेने घेतला. या शासन-आदेशाप्रमाणे घर पती-पत्नीच्या नावे असावं असे निर्देश आहेत. पण या आदेशाची अंमलबजावणी होताना दिसत नाही. ग्रामसेवकांनी गावात पुढाकार घेऊन ती करायला हवी. पण ग्रामसेवकांना त्यात रस नव्हता. म्हणून संस्थेने बीडीओंना हस्तक्षेप करण्यास भाग पाडलं. तरीही गावपातळीवर विरोध होतच होता. ग्रामसेवक पुरुषांच्या परवानगीशिवाय घर दोघांच्या नावे करण्यास राजी नव्हते. 'ग्रामसभेत ठराव घ्या. मग बघू!' अशी टाळमटाळ सुरू होती. पण संस्थेने नेटाने ही मोहीम तडीस नेली. अखेर सांगोल्यातील वीस हजार घरं पती-पत्नीच्या नावे करण्यात शहाजीभाऊंना यश आलं. ही मोहीम फत्ते करणं अर्थातच सोपं नव्हतं. शहाजीभाऊ म्हणतात,''अजूनही १००% यश आम्हाला मिळालेलं नाही. अनेकदा गावातल्या ज्येष्ठ महिलांचा विरोध यामध्ये मोठा अडसर ठरतो. पण त्यांच्याशी या निमित्ताने होणारा संवादच परिवर्तनाची बीजं पेरण्यासारखा आहे, याचं समाधान आहे!''

रोजगार हमीसारख्या योजनांमधून गरीब व दलित स्त्रियांना पाठबळ मिळायला हवं, असं शहाजीभाऊंना वाटतं. ते म्हणतात, ''आज रोजगार हमीत पारंपरिक कामंच स्त्रियांसाठी गृहित धरली जातात. पण कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यशेती यांसारख्या उपक्रमांकरता महिलांना रोजगार हमीतून उत्पन्न मिळालं, तर परिस्थिती बदलू शकते...''

भूमिहीन असोत, की दुष्काळाच्या झळा सोसणारे गरीब वंचित – या मंडळींमध्ये आत्मभान आणण्याचं कार्यच तर शहाजीभाऊ करत आलेत.

प्रशांत खुंटे
prkhunte@gmail.com
९७६४४३२३२८